| MHKO030045782023 | म.कौ.हिं.सं.का.अर्ज क्र.८८/२०२३.<br>निकिता अक्षय मगदुम<br>*विरुध्द*<br>अक्षय पांडुरंग मगदुम व इतर. |
|---|---|

## निशाणी क्रमांक ०९ वरील पारित आदेश

०१. सदर कामी दोन्ही पक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. त्या अनुषंगे खालील मुद्दे विचाराधीन आहेत. त्याचे उत्तर कारणमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार ही तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प. याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | **होकारार्थी.** |
| ०३. | अर्जदार या दरमहा रक्कम रु.२५,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०४. | आदेश काय ? | **आदेशाप्रमाणे.** |

## का र ण मि मां सा

०२. सदर कामी वि.प. यांनी अर्जदार यांच्यासोबत असलेले त्यांचे वैवाहिक नातेसंबंध मान्य केले आहेत. त्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदार या पत्नी या नात्याने वि.प.

क्र.०१ यांच्याकडे अंतरिम पोटगी मागण्यास हक्कदार आहेत. सदर कामी अर्जदार यांनी वि.प.यांच्याविरुध्द कौटूंबिक हिंसाचा–याच्या तक्रारी केलेल्या आहेत. त्या सर्व तक्रारी वि.प. यांनी अमान्य केल्या आहेत. त्यामुळे वि.प. व अर्जदार यांच्यातील कथने व प्रतिकथने लक्षात घेता कौटूंबिक हिंसाचार झाला का ही बाब पुराव्याअंती निष्कर्षित करणे न्यायोचित वाटत आहे. अभिलेखावर उपलब्ध पुरावा हा वि.प. यांच्याविरुध्द प्रथमदर्शनी केस सिध्द करण्यास पुरेसा आहे. म्हणुन घरगुती हिंसाचार कायद्याचे कलम २३ नुसार अर्जदार यांनी वि.प. यांच्याविरुध्द प्रथमदर्शनी व सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे. म्हणुन मुद्दा क्र.०१ व ०२ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**०३.** सदर कामी अर्जदार कथन करतात की, वि.प.क्र.०१ मिलिटरीत नोकरीस असुन त्यांना दरमहा रक्कम रु.८०,०००/– इतके उत्पन्न मिळते. तसेच त्यांची चार एकर बागायत जमिन असुन उसाच्या पिकापासुन त्यांना प्रती वर्षी चार–पाच लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. म्हणुन त्यांना दरमहा रक्कम रु.२५,०००/– अंतरिम पोटगी म्हणुन देण्याबाबत आदेशित करावे अशी विनंती करतात. या उलट वि.प. हे युक्तिवादात कथन करतात की, त्यांचे पालक वयोवृध्द असुन त्यांची जबाबदारी त्यांच्यावरच आहे. त्यांना दरमहा रक्कम रु.२६,०००/– इतके उत्पन्न मिळते. म्हणुन कमीतकमी अंतरिम पोटगीच्या रक्कमेबाबत आदेशित व्हावे अशी विनंती करतात. वि.प. यांनी दाखल केलेले मालमत्तेचे शपथपत्र नि.क्र.०७ वर दाखल असुन त्यात ते मान्य करतात की, त्यांना रक्कम रु.२६,८००/– मुलभुत पगार (basic payment) आहे. मात्र सदर कामी अर्जदार यांनी वि.प.क्र.०१ यांच्या मासिक उत्पन्नाबाबतचा दाखला अभिलेखावर दिलेला नाही. अर्जदार हे भारतीय सैन्य दलात शिपाई या पदावर नोकरीस आहेत ही बाब सकृतदर्शनी दिसुन येत आहे. सर्वसामान्यपणे बेसिक पगाराच्या दुप्पट रक्कम ही मासिक पगार म्हणुन असते. मात्र सदर कामी वि.प. हे त्यांना मासिक पगार रक्कम रु.२६,८००/– इतके मिळत असल्याचे

मान्य करतात. आयकर विवरण कमी उत्पन्न असल्यामुळे तो कमी होतो असे कथन करतात. परंतु वि.प. यांनी मालमत्तेचे शपथपत्राबरोबर आयकर विवरणाबाबत कोणतेही कागद दिलेले नाहीत. त्यांनी रक्कम रु.५,७०,०००/– कर्ज काढले असुन त्याचा मासिक हफ्ता रक्कम रु.११,८१९/– इतका जात असल्याचे कथन करतात. त्या अनुषंगे कर्जाबाबतचे कागदपत्र अभिलेखावर दाखल नाहीत. यावरुन सध्याचे वस्तुंचे भाव, मुलभुत गरजा, अर्जदार यांचा खर्च या सर्व बाबी लक्षात घेता अर्जदार यांना दरमहा रक्कम रु.१०,०००/– इतकी अंतरिम पोटगी सदर अर्ज दाखल केलेल्या तारखेपासून वि.प.क्र.०१ यांना पुढील आदेश होई पावेतो आदेशित करणे न्यायोचित वाटत आहे. अर्जदार या नि.क्र.०९ वरिल अर्जात वि.प.क्र.०२ ते ०५ यांना त्यांना सदरचे प्रकरण संपेपर्यंत शाब्दीक, मानसिक त्रास देऊ नये, त्यांना संपर्क करु नये तसेच त्यांना वि.प.यांच्या पासुन जिवितास धोका असल्याने पोलीस संरक्षण मिळण्याबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे. मात्र उपलब्ध कागदपत्रावरुन अर्जदार यांची पोलीस संरक्षण मिळण्याबाबतची विनंती नामंजुर करणे न्यायोचित वाटत आहे. याउलट वि.प.क्र.०१ ते ०५ यांनी सदरचे प्रकरण प्रलंबित असताना अर्जदार यांच्याशी प्रत्यक्ष अथवा इ–माध्यमांमार्फत संपर्क करु नये, अर्जदार यांना सदरचे प्रकरण निकाली होई पावेतो शारिरीक व मानसिक त्रास देऊ नये असे आदेशित करणे न्यायोचित वाटत आहे. म्हणुन मुद्दा क्र.०३ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.०४ करीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**०१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वि.प. यांनी अर्जदार यांना अर्ज दाखल केलेल्या तारखेपासुन पुढील आदेश होई पावेतो दरमहा रक्कम रु.१०,०००/– (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी अंतरिम पोटगी म्हणुन द्यावी.

**०३.** सदर अर्ज प्रलंबित असताना वि.प.क्र.०१ ते ०५ अथवा वि.प. तर्फे इसमांनी अर्जदार यांना कोणत्याही प्रकारे शाब्दीक, मानसिक अथवा शारिरीक छळ करु नये. त्यांनी कोणत्याही पध्दतीने (प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष, सोशल मिडीयाच्या म्हणजेच अप्रत्यक्ष पध्दतीने भेटू नये) असा प्रतिबंधात्मक आदेश पारित करणे न्यायोचित वाटते.

**०४.** वि.प. यांनी म.कौ.हि.सं.कायदा कलम १९(३) प्रमाणे तो भविष्यात अर्जदार हिला कोणत्याही प्रकारे शारिरीक व मानसिक त्रास होईल अशी कोणतीही कृती सदर प्रकरणाचा निकाल होईपर्यंत करु नये. तसे लेखी बंधपत्र या आदेशा – पासून एक महिन्याच्या आत दाखल करण्यात यावे.

**०५.** अर्जदार हिला निर्देशीत करण्यात येते की, तिने मुळ अर्जावर विनाविलंब तिचा साक्षीपुरावा सादर करावा तसे न केल्यास अंतरिम आदेशाबाबत योग्य तो आदेश करण्यात येईल.

**०६.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना विनामुल्य देण्यात यावी.

MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Digitally signed by MAHADEVI SHIVRAJ MANAGULI
Date: 2024.09.24 11:48:07 +0530

(श्रीमती एम.एस.मनगुळी )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.६, कोल्हापूर.

दि.२३/०९/२०२४.

| **<u>प्रमाणपत्र</u>** | |
|---|---|
| मी अशी खात्री देते की, सदर पी.डी.एफ. संचिकेमधील मजकुर मुळ न्यायानिर्णयाप्रमाणे / आदेशा प्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत. | |
| लघुलेखकाचे नाव | श्रीमती किर्ती कि. ढेरे. |
| न्यायालयाचे नाव | श्रीमती एम.एस.मनगुळी, ६वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग १, कोल्हापूर. |
| आदेश दिनांक | २३.०९.२०२४. |
| पिठासिन अधिका—यानी स्वाक्षरी केलेला दिनांक | २३.०९.२०२४. |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड केलेला दिनांक | २४.०९.२०२४. |